# प्रकरण - तिसरे

---

# गौतम बुद्धांचा सामाजिक कराराचा व राज्य उत्पत्तीचा सिद्धांत

## प्रकरण - ३ रे

# गौतम बुद्धांचा सामाजिक कराराचा व राज्य उत्पत्तीचा सिद्धांत

मनुष्य हा समाजशील व राजकीय प्राणी आह. तो समाजाशिवाय राहूच शकत नाही आणि माणसाची प्रत्येक कृती ही राजकीय असते. समाज व राज्य या दोन्ही संस्था परस्परावर अवलंबून आहेत. कारण समाजाशिवाय राज्य अस्तित्त्वातच येवू शकत नाही व समाजाला नैतिक अधिष्ठान प्राप्त करून देण्यात महत्त्वपूर्ण कार्य राज्यसंस्था करते. त्यामुळे समाजशास्त्र व राज्यशास्त्र या दोन्ही विद्याशाखाअंतर्गत समाजसंस्था व राज्यसंस्था यांचा अभ्यास आणि संशोधन मोठ्या प्रमाणात घडुन आले आहे. राजकीय अभ्यासाच्यादृष्टीने राज्यसंस्था ही संकल्पना अतिशय महत्त्वाची आहे. राज्यसंस्था हा इतर सर्व राजकीय संकल्पनांचा मुलभूत पाया आहे. राज्यसंस्थेचा अभ्यासाशिवाय राज्यशास्त्राचा अभ्यास पूर्ण होवूच शकत नाही. परंतु या संकल्पनेविषयी विचारवंतामध्ये अनेक मतप्रवाह आहेत. काही विचारवंत राज्यसंस्थेकडे एक वैधानिक रचना म्हणून पाहतात. तर काही विचारवंताना ती एक 'आवश्यक - अरिष्ट'[१] वाटते. कोणाला ती समाजाशी समकक्ष वाटते तर कोणाला ती समाजातील असंख्य समुहांपैकी एक वाटते. ॲरिस्टॉटलच्या मते, "राज्यसंस्था हा अनेक कुटूंबांचा व खेड्यांचा संघ होता. परिपूर्ण व स्वयंपूर्ण जीवन म्हणजे त्याला आपण सुखी व सन्मानाचे जीवन म्हणतो ते उपलब्ध करून देणे हे त्या संघाचे प्रयोजन होते."[२] परंतु परंतु या राज्यसंस्थेची उत्पत्ती कशी झाली हे कोणीही ठामपणे सांगू शकत नाही. राज्यसंस्था निर्माण होण्यापूर्वी मानवी समाजाची अवस्था नेमकी कशी होती आणि राज्यसंस्था स्थापन करण्याची नेमकी काय गरज निर्माण झाली असावी हे ऐतिहासिक तथ्यांच्या व पुराव्यांच्या आधारे सांगता येणे अशक्य आहे. मात्र अगदी प्राचीन काळापासून केवळ अंदाज किंवा तर्काच्या आधारे काही विचारवंतानी राज्यउत्पत्तीचे वेगवेगळे सिद्धांत मांडले आहेत.

आधुनिक काळात पाश्चात्य विचारवंत हॉब्ज, लॉक, रूसो यांनी जे राज्यउत्पत्ती संबंधी सिद्धांत मांडले आहेत ते प्रसिद्ध आहेत. प्लेटोच्या रिपब्लिक ग्रंथाच्या दुसऱ्या

प्रकरणात ग्लॅकॉनने सामाजिक कराराचा उल्लेख केला आहे. भारतामध्येही प्राचीन काळामध्ये विविध सामाजिक करार आणि राज्यउत्पत्तीचे सिद्धांत मांडण्यात आले आहेत. प्राचीन भारतामध्ये बौद्ध साहित्यामध्ये सामाजिक करार व राज्यउत्पत्तीचा सिद्धांत मांडण्यात आला.

त्याचबरोबर महाभारतातील 'शांतीपर्व', 'कौटिल्याचे अर्थशास्त्र' या ग्रंथामधूनही राज्यउत्पत्तीसंबंधी मुलभूत विवेचन करण्यात आले आहे. प्राचीन भारतात पाश्चात्य राज्यउत्पत्ती व सामाजिक कराराच्याप्रमाणेच काही सिद्धांताची मांडणी करण्यात आली.

**गौतम बुद्ध आणि राज्याच्या उदयाचे इतर सिद्धांत :**

गौतम बुद्धांचा सामाजिक कराराचा व राज्याच्या उदयाचा सिद्धांत त्यांनी आपल्या शिष्यांना केलेल्या उपदेशातून 'दीघनिकाय' या ग्रंथामध्ये प्रतिबिंबित झाला आहे. गौतम बुद्धांचे विचार हे प्राचीन भारतीय राजकीय विचारांचे महत्त्वाचे स्त्रोत ठरतात. गौतम बुद्धांनी वेगवेगळ्या राजांना, आपल्या शिष्यांना केलेल्या उपदेशातून त्यांचे राजकीय विचार ध्वनीत होतात. दीघनिकाय या ग्रंथमध्ये त्यांनी मांडलेला राज्याच्या उदयासंबंधीचा सिद्धांत महत्त्वाचा आहे. तो कदाचित राज्य उत्पत्तीसंबंधीचा जगातील पहिला सिद्धांत ठरतो. गौतम बुद्धांनी मांडलेल्या या सिद्धांतामध्ये राज्याच्या ईश्वरी उदयाच्या कल्पनेपेक्षा सामाजिक करारास अधिक महत्त्व दिले आहे. गौतम बुद्धांचा राज्यउत्पत्तीचा सिद्धांत पाहण्याअगोदर याठिकाणी प्राचीन भारतात मांडण्यात आलेले इतर राज्यउत्पत्तीविषयक सिद्धांत पाहणे महत्त्वाचे व औचित्यपूर्ण ठरेल.

**अ ) राज्यउत्पत्तीचा दैवी सिद्धांत –**

जगातील सर्वच देशामध्ये राज्यउत्पत्तीचा दैवी सिद्धांत मांडण्यात आला आहे. या सिद्धांताने राज्यसंस्तेला धर्मसंस्थेप्रमाणेच पावित्र्य मिळवून दिले. राज्याची निर्मिती ईश्वराने केली आहे, त्यामुळे ती पवित्र आहे अशी भावना जनमानसांमध्ये एकोणिसाव्या शतकाच्या उदयापर्यंत होती. जगातील सर्वच देशामध्ये राज्य हे ईश्वर निर्मित असून राजा हा ईश्वराचा अंश आहे ही कल्पना दृढ होती. चीनमध्ये राजाला ईश्वराचा पुत्र मानण्यात येत असे. इजिप्त व रोममध्येही राजाला ईश्वरीय स्वरूप देण्यात आले होते.

इस्लाममध्ये प्रथम राजाची निवड ही समान अधिकार असलेल्या लोकांकडून केली जात असे. परंतु; मोगल कालखंडामध्ये राजा हा ईवराची सावली आहे असे मानण्यात येवू लागले. हिंदू पुराणात राजाला विष्णूचा अवतार मानण्यात आले आहे. म्हणजेच प्राचीन हिंदी, चीनी, यहुदी, ख्रिस्ती इ. सर्वच राज्यसत्तेच्या पाठीशी दैवी शक्तीचे अधिष्ठान आहे. राजकीय स्ता ईश्वरी शक्तीचा अंश आहे आणि प्रजाजनांच्या भक्तिभावास ती प्रत्यक्ष परमेश्वराइतकीच पात्र आहे अशी शिकवण बहुतेक सर्वच धर्माच्या धर्मग्रंथामध्ये दिलेली आढळते.[३]

राज्यउत्पत्ती संबंधीचा असाच एक सिद्धांत प्राचीन भारतामध्ये महाभारतातील शांतीपर्वामध्ये[४] मांडण्यात आला आहे. या सिद्धांताप्रमाणे प्राचीन काळामध्ये राज्य ही नव्हते आणि राजा ही नव्हता. त्याकाळात लोक न्यायाने (धर्माने) वागत होते.

"नैवी राज्यम: । न राज्यास्ती ।।

नच दंडो : । न दंडिता: ।।

धर्म नैव प्रजा सर्वात रक्षयन्ती परस्परम् ।।-

जेव्हा राजा ही नव्हता आणि राज्य ही नव्हते, तेव्हा लोक परस्परांचे रक्षण धर्माने करीत असत. परंतु काही काळानंतर लोकांमध्ये वितुष्ट निर्माण झाले. लोकांत परस्पर संघर्ष निर्माण झाला व या संघर्षातूनच अराजकतेची परिस्थिती निर्माण झाली. तेव्हा या अराजकेतून सुटका करून घेण्यासाठी लोक ब्रह्मदेवाकडे गेले व तयंनी ब्रह्मदेवास या अराजकतेतून सुटका करून घेण्यासाठी एक राजा देण्याविषयी विनंती केली. तेव्हा देवाने मनूला पृथ्वीवर शांतता व सुव्यवस्था निर्माण करण्यासाठी पाठविले. त्यामुळे राजा किंवा राजपद ईश्वराने निर्माण केले अशी भावना लोकांच्या मनात निर्माण झाली.

**ब ) बळाचा सिद्धांत -**

'बळी तो कान पिळी', 'जिसकी लाठी उसकी भैंस' किंवा 'मात्स्यन्याय' हा या सिद्धांताचा मुलभूत पाया आहे. ज्याच्या अंगी ताकद असेल तो राज्याची सूत्रे हाती घेणारच हा या सिद्धांताच्या पुरस्कर्त्यांच्या मते निसर्गनियमच आहे.[५] "युद्धातुनच

राजाची खरी निवड होत असे.'' हे या सिद्धांताचे मुलभूत सूत्र आहे. याच सिद्धांताला ''मात्स्यन्याय'' असेही म्हणतात. ज्याप्रमाणे मोठा मासा लहान माश्यांना गिळंकृत करतो त्याचप्रमाणे समाजातील वरिष्ठ वर्गाने कनिष्ठ वर्गावर वर्चस्व प्रस्थापित केले तर चालेल व तोच खरा न्याय होय. युद्धात ज्या गटाचा प्रमुख विजयी होतो, तोच सत्ता, संपत्ती व सुखोपभोगाचा निर्विवादपणे धनी असतो. बलाढ्य टोळीप्रमुख जेव्हा त्याच्या सशक्त सहकाऱ्यांच्या साह्याने शेजारच्या टोळ्या जिंकून घेतो आणि स्वत:ला टोळ्यांचा राजा म्हणून घोषित करतो, तेव्हा तो राज्य स्थापन करतो.

राज्यसंस्थेची निर्मिती करीत असताना ज्याच्याकडे जास्त बळ आहे, त्याने राज्याचा ताबा घ्यावा अशी भूमिका काही प्राचीन अर्थशास्त्रज्ञानी मांडली. राज्य करण्याची ज्याच्यामध्ये क्षमता आहे, त्याने हातामध्ये राज्य घ्यावे, अशी भारद्वाज या प्राचीन अर्थशास्त्रज्ञाची भूमिका आहे. महाभारतात ही एके ठिकाणी बळाचा वापर करून राज्य मिळवावे असा उल्लेख सापडतो कारण, त्याशिवाय समाजातील मात्स्यन्याय संपत नाही. बळाच्या साह्याने राजाला अधिमान्यताही मिळते. राज्यनिर्मितीमध्ये बळाची भूमिका महत्त्वाची आहेच याशिवाय ती राज्यसंस्था, समाजरचना टिकवून ठेवण्यासाठी व राज्याअंतर्गत शांतता आणि सुव्यवस्था निर्माण करण्यासाठी बळाचा वापर केला जातो.

**क ) राज्याच्या विकासाचा सिद्धांत -**

राज्याच्या विकासाचा सिद्धांत राज्यनिर्मितीचा ऐतिहासिक किंवा उत्क्रांती सिद्धांत या नावानेही ओळखला जातो. हा सिद्धांत इतर राज्यउत्पत्तीच्या सिद्धांतापेक्षा सर्वाधिक समाधानकारक, वस्तुनिष्ट आणि विश्वसनीय मानला जातो.[६] या सिद्धांताचे असे प्रतिपादन आहे की, राज्यसंस्थेची निर्मिती ईश्वरी आज्ञेने, किंवा कोणत्याही पाशवी बळाच्या आधारे किंवा एखाद्या ठरावातून वा करारातून झालेली नसून एका संथ दीर्घकालीन विकासक्रमातून आजची राज्यसंस्था उत्क्रांत झालेली आहे. तरीही उत्क्रांतीच्या या प्रक्रियेत धर्मसंस्था, बळ, समाजाचा आर्थिक विकास, राज्यास प्रादेशिक स्वरूप प्राप्त होणे आणि लोकांमधल्या जाणीवजागृतीचे निश्चितपणे योगदान आहे.

परंतु प्राचीन भारतामध्ये राज्याच्या विकासाचा सिद्धांत फार व्यवस्थितरीत्या मांडण्यात आला नाही. त्यासंबंधी अथर्ववेदामध्ये आणि पाणिनीच्या अष्ठाध्यायीमध्ये दोन उल्लेख आढळतात ते पुढीलप्रमाणे.

१) सुरूवातीस कुटूंब होते, त्यातून गावाची निर्मिती झाली. अनेक गावांच्या एकत्र येण्यातून राज्य निर्माण झाले. ही राज्याच्या विकासाची, उत्क्रांतीची प्रक्रिया होती व या प्रक्रियेतूनच राज्याची निर्मिती झाली.

२) पाणिनीच्या अष्ठाध्यायीमध्ये जनपदांची निर्मिती अनेक गावांच्या एकत्रिकरणातून झाली. व जनपदांच्या एकत्रिकरणातून झाली व जनपदांच्या एकत्रिकरणातून राज्याची निर्मिती झाली. असा उल्लेख आढळतो.[७]

राज्याच्या विकासाचा सिद्धांत प्राचीन भारतामध्ये पाश्चात्य परंपरेच्या तुलनेत फारसा विकसित झाला नाही तो कमजोरपणे मांडण्यात आला.

**जातक कथामधील राजाच्या निवडणूकीचा सिद्धांत :**

प्राचीन भारतामध्ये राज्याच्या निवडीसंदर्भामध्ये वैदिक साहित्यामध्ये प्रथम मांडणी केल्याचे आढळून येते. ऋग्वेद व अथर्ववेदामध्ये राजाच्या निवडीसंदर्भात उल्लेख आढळून येतात. अनेक इतिहास संशोधकांनी प्राचीन भारतात राजेशाही ही अनुवांशिक नसून राजाची निवड केली जात होती, असे मत व्यक्त केले आहे. दीक्षितारांच्या मते, प्राचीन भारतात नंतर राजेपद अनुवांशिक बनले तरीही कोणत्या ना कोणत्या स्वरूपात 'निवडणूक' राजाच्या नियुक्तीचा एक आवश्यक भाग बनून राहिली. आपला वारस ठरविण्याचा अधिकार राजास नव्हता. तो फार तर आपला वारस सूचित करी. तो लोकमान्य होवू शकत असला तरच राजा होई.[८] ऋग्वेदामध्ये राजाची निवड विश् करते असा उल्लेख आहे. विश् म्हणजे सर्वसामान्य लोक होय. यामध्ये वैश्य व शूद्रांचा समावेश असे. अथर्ववेदामध्येही राजाच्या निवडीचा उल्लेख आहे. शतपथ-ब्राह्मणामध्ये[९] देवांनी इंद्राला राजा म्हणून का निवडले याचे विवेचन आहे. पूर्वी सर्व देव समान होते. त्यांच्यामध्ये कोणताही भेदभाव नव्हता. परंतु ज्या-ज्या वेळी देवांचे असुरांशी युद्ध झाले त्या-त्या वेळी त्यांचा युद्धांमध्ये पराभव झाला. त्यावेळी सर्व

देवांच्या असे लक्षात आले की, आपल्या मध्ये नेता नाही व नेतृत्त्वाच्या अभावामुळेच आपला पराभव होत आहे. तेव्हा त्यांनी सर्वानुमते इंद्राची आपला राजा म्हणून निवड केली. त्यांना इंद्राच्या रूपाने नेतृत्त्व मिळाले, त्यामुळे पुढे जेव्हा देवांचा व असुरांचा संघर्ष झाला, त्यावेळी देवांचा विजय झाला.

अशाच प्रकारची राजाच्या निवडीसंदर्भातील जातककथा बौद्ध साहित्यामध्ये आढळून येते. बौद्ध साहित्यामध्ये जातककथांना अतिशय महत्त्वाचे स्थान आहे. त्या एकूण ५४६ कथा असून त्या भगवान गौतम बुद्धांच्या पूर्वजन्मावर आधारित आहेत. या कथा स्वत: गौतम बुद्धांनी भिक्षुसंघात बसून निरनिराळ्या प्रसंगानुसार सांगितल्या. बौद्ध तत्त्वज्ञान व तत्कालिन समाज व राजकीय जीवनाचे चित्रणही त्यामध्ये आढळते. अशाच प्रकारची राजाच्या निवडीसंदर्भातील कथा "सिद्धार्थ-जातक खंड-२रा" मध्ये उल्लूकजातक[१०] या नावाने आली आहे. ही कथा प्रामुख्याने पक्षांच्या राजाच्या निवडीसंदर्भातील आहे. ही कथा गौतम बुद्धांनी जेतवनात राहात असताना आपल्या भिक्षूंना सांगितली.

अगदी प्राचीन काळी पहिल्या कल्पातील लोकांनी एकत्र येवून एका देखण्या, सौंदर्यसंपन्न, सर्व लक्षणांनीयुक्त आणि ज्याला आज्ञा देण्याची पूर्ण पात्रता आहे अशा पुरूषाला राजा केले. चतुष्पाद प्राण्यांनीही सिंहाला आपला राजा केले. त्याचबरोबर महासागरातील माश्यांनीही आनंद नावाच्या माश्याला आपला राजा केले.

तेव्हा या सर्व घटनांनी प्रभावित होवून पक्षांनीही आपला एक राजा निवडण्याचे ठरविले व त्यानुसार ते हिमालयातील एका मोठ्या कातळावर एकत्र जमा झाले व त्यांनी आपापसामध्ये अशी चर्चा केली की, "माणसांनी राजा निवडला, पशूंनी निवडला, माश्यांनाही राजा आहे पण आमच्यात मात्र राजा नाही. तर आपण अराजक अवस्थेत राहणे बरे नाही. आपणही आपला राजा निवडूया." मग तसा पात्र पक्षी शोधताना पक्ष्यांनी प्रथम घुबडास पाहिले व त्याची निवड करण्याचे ठरविले. त्यातील एका पक्ष्याने घुबड राजा होण्यास सर्वांची सम्मती आहे का नाही असे पाहण्यासाठी दोन वेळा घुबडाच्या नावाचा पुकार केला. दोन घोषणा झाल्यावर तिसऱ्या घोषणेस

मात्र कावळ्याने घुबडाच्या राजा होण्यास आक्षेप घेतला. आणि त्याने सभेस सांगितले की, "राज्याभिषेकाच्या वेळी जर याचे तोंड असे अक्राळ-विक्राळ असेल तर तो आपणावर राज्य करताना कसा दिसेल. तो आमच्यावर जेव्हा रागावेल तेव्हा आपली तापलेल्या तव्यावर ज्याप्रमाणे तीळ तडतडतात तशी अवस्था होईल. आपणास घुबडाच्या निवडीचा त्रासच होईल. त्यामुळे घुबड आपला राजा व्हावे हे मला मान्य नाही." असे सांगितले व तो सभेतून उडून निघून गेला.

नंतर सर्व पक्षांनी कावळ्याच्या मतावर पुनर्विचार केला व घुबडाची निवड रद्द करून त्यांनी सुवर्ण-हंसाला आपला राजा म्हणून निवडले. या उलूक जातक कथेतून आपणास राज्यशास्त्राच्यादृष्टीने प्राचीन भारतातील प्रचलित असलेल्या राजाच्या निवडीची प्रक्रिया समजून येते. या कथेतून आपणास हे दिसून येते की, राजाची निवड सर्वानुमते केली जात होती. राजाची निवड करण्याची एक विशिष्ठ अशी प्रक्रिया होती. व या सभेमध्ये सर्व सभासदांच्या मतास सारखेच मूल्य होते. या सभेस कावळा हा सर्वात लहान असला_तरी सभा त्यास लहान पक्षीसुद्धा बुद्धीमान, प्रज्ञावंत असतात म्हणून बोलण्यास व आपले मत मांडण्यास परवानगी देते. म्हणजेच प्रत्येक सदस्यास आपले मत मांडण्याचा हक्क असे. या सभेचा कारभार लोकशाही तत्त्वानुसार चालत असे. याचाच अर्थ राजाची निवड लोकशाही मार्गाने घडून येत होती.

**गौतम बुद्धांचा सामाजिक कराराचा सिद्धांत :**

प्राचीन भारतीय सामाजिक आणि राजकीय विचारांमध्ये बौद्ध साहित्याने मोठे योगदान दिले आहे. विशेषत: माणसाचा आणि त्याच्या सामाजिक आणि राजकीय संस्थांच्या उदयाच्यासंदर्भात हे योगदान महत्त्वपूर्ण आहे. या सिद्धांताच्या मते, राज्याचा व समाजाचा विकास हा सामाजिक करारातून झाला आहे. गौतम बुद्धांचा हा सामाजिक कराराचा सिद्धांत पाली ग्रंथ दीघनिकायातील अग्गनासुत्तामध्ये प्रतिबिंबित झाला आहे.[११] या पालीसूत्रानुसार गौतम बुद्ध आणि त्यांचे शिष्य यांच्यामध्ये जो संवाद झाला त्याद्वारे त्यांनी समाजव्यवस्थेच्या दैवी उत्पत्तीच्या वैदिक ग्रंथावर आधारलेल्या सिद्धांताला खुले आव्हान दिल्याचे दिसून येते. एके दिवशी बौद्ध धर्म स्वीकारलेले दोन तरूण ब्राह्मण

गौतम बुद्धांना असे सांगतात की, "आम्ही तुमचे शिष्यत्व पत्करल्यामुळे आमचे इतर सोबती आमचा धिक्कार करतात, त्यांच्या मते, आम्ही ब्रह्माच्या तोंडातून निर्माण झालेल्या ब्राह्मण या उच्चवर्णाचा त्याग करून, ब्रह्माच्या पायापासून निर्माण झालेल्या शूद्र या कनिष्ठ वर्गाचा स्वीकार केला आहे."

तेव्हा गौतम बुद्ध पहिल्यांदा असे सांगतात की, श्रेष्ठत्त्व किंवा कनिष्ठत्त्व ही कोणत्या एका वर्गाची मक्तेदारी नसून एखाद्या व्यक्तीचे श्रेष्ठत्त्व हे त्याच्या सदाचारावर, चारित्र्यावर आणि उत्तम शीलावर अवलंबून असते. त्यामुळे ब्राह्मण हा वर्ग जन्माने श्रेष्ठ ठरत नाही. त्यानंतर गौतम बुद्ध ब्राह्मण वर्ग हा ब्रह्माच्या मुखातून व शूद्र वर्ग त्याच्या पायातून जन्मला व ब्राह्मण हे ब्रह्माचे वंशज आहेत या मताचे खंडन करतात आणि जगाच्या उत्पत्तीचा पूर्वीपासूनचा इतिहास सांगतात. त्यांच्या मते, फार-फार वर्षापूर्वी हे जग नाहीसे झाले व पुन्हा जगाची निर्मिती झाली. या जगाचे पूर्वीचे निवासी आभास्वर देवाच्या लोकांत जन्मले.[१२] व हे जग हळूहळू विकसित होवू लागले. या सत्ययुगामध्ये लोक इतक्या पूर्णत्त्वास गेले होते की त्यांना शारीरिक अस्तित्त्व जवळ-जवळ नव्हतेच. अशा दिव्य व्यक्ती तेजाने तळपत, शांतता व प्रकाश अनुभवीत, हवेत जणू नृत्य करीत दीर्घकाळ जगत होते. हा आनंद व शांतता युगानुयुगे टिकून राहिला. त्याकाळात अजून चंद्रही नव्हता ना सूर्यही, तारे आणि नक्षत्रेही अजून निर्माण झाले नव्हते. त्याचबरोबर ना महिना नव्हता ना पंधरवडा, ऋतूंची आणि वर्षाचीही निर्मिती झाली नव्हती.[१३] काही काळानंतर सुवासिक आणि चविष्ठ भातासारख्या तवंग असलेल्या पाण्यातून पृथ्वीचा उदय[१४] झाला. मनुष्यांनी हावरटपणाने त्याचा आस्वाद घेतला. त्यामुळे त्यांची दिव्यतेजांनी तळपणारी अवस्था नष्ट झाली व माणसाची वायूरूप अवस्था संपून त्यांनी घनरूप धारण केले. त्याचवेळी चंद्र आणि सूर्य, तारे आणि नक्षत्रे स्पष्टपणे दिसू लागले. आणि ऋतु, महिने, वर्ष यांचीही निर्मिती झाली. ज्यावेळीस मनुष्याची वायुरूप अवस्था संपून त्यांनी घनरूप धारण केले त्यावेळेसच त्यांना कमी-अधिक प्रमाणात सौंदर्य प्राप्त झाले व सौंदर्यवान माणसे कुरूप माणसांचा तिरस्कार करू लागली. कालांतराने पृथ्वीवरील भातासारखा तवंग नाहीसा झाला. पहिल्यांदा

काही प्रमाणात वनस्पतींची निर्मिती झाली व विकासाच्या अवस्थेत शेवटी टरफल नसलेल्या परिपक्व भाताची निर्मिती झाली. दरम्यानच्या काळात मनुष्याचे शरीर घनरूप बनल्याने स्त्री आणि पुरूष असे भिन्नलिंगी दोन वर्ग निर्माण झाले. टरफल नसलेल्या परिपक्व भातावर मनुष्याने जीवन व्यतीत केले. नंतर लिंगभिन्नत्त्वामुळे स्त्री आणि पुरूषामध्ये कामवासना निर्माण झाली व या कामवासनेच्या पूर्ततेसाठी व भाताच्या साठवणूकीसाठी माणसांनी घरांची निर्मिती केली. मनुष्य धनसंचय करू लागला. त्यामुळे परिपक्व भात संपला तेव्हा लोक दु:खी, कष्टी व शोकाकुल होवून एकत्र जमले व म्हणाले, ''आपण पूर्वी दिव्यदेही होतो परंतु आपल्या वाईट कृत्यामुळे आपण या अवस्थेला पोहचलो आहोत. आपण आपापसामध्ये भाताच्या शेताची वाटणी करून त्याच्या सीमा निश्चित करूया.''[१५] तरीही काही लोभी माणसे स्वत:च्या भाताचे संरक्षण करीत असतानाच दुसऱ्याच्या शेतातील भात चोरून आणून त्याचा वापर खाण्यासाठी करू लागली तर आपल्या भाताचा संचय करून ठेवू लागली. परंतु इतर माणसांनी त्यांना लगेच पकडले व त्याच्यावर चोरीचा आरोप ठेवला. तेव्हा चोरी केलेल्या माणसांनी पुन्हा आपण असे करणार नाही व जर असे दुसऱ्यांदा घडले तर आपण शिक्षेस पात्र ठरण्याचे वचन दिले.

अशा प्रकारे माणसांना चोरी, निंदा, खोटे बोलणे आणि हिंसा या चार दुष्कृत्यांची जाणीव झाली.[१६] तेव्हा पुन्हा सर्व माणसे एकत्र जमा झाली व त्यांनी आपल्या या चार दुष्कृत्याबद्दल व्यथित, दु:खी होवून विलाप केला आणि आपल्यामधून सर्वात सुंदर, कार्यकुशल आणि उत्तम प्रकृती असलेल्या एका व्यक्तीची नेता म्हणून निवड केली. या व्हाक्तीने पुढील अटीवर नेता होण्यास मान्यता दिली. ''जिथे क्रोधित होणे आवश्यक आहे व योग्य वाटेल तेथे क्रोधित होईन; ज्याचा धिक्कार करणे योग्य असेल, त्याला धिक्कारीन, ज्याची लायकी हद्दपारीची असेल त्याला हद्दपार करीन. त्याच्या बदल्यात लोकांनी आपल्या जवळील भातातून काही हिस्सा या नेत्याला देण्याचे मान्य केले.[१७] अशा प्रकारे निवड झालेल्या नेत्यास १)महासम्मत २) खत्तिय ३) राजा ही तीन पदनामे प्राप्त झाली.[१८] खत्तिय म्हणजे

शेताचे रक्षण करणारा त्यास संस्कृतमध्ये क्षत्रिय असे म्हणतात.[११] व अशाप्रकारे समाजात सर्वप्रथम क्षत्रिय वर्गाची निर्मिती झाली. पुन्हा काही ठराविक लोक समाजातील अपवित्र गोष्टींमुळे दुःखी झाले व त्यांनी परिव्रज्या स्वीकारली आणि ते गावाच्या बाहेर जंगलामध्ये जावून ग्रंथनिर्मिती करू लागले. हा वर्ग ब्राह्मण वर्ग म्हणून ओळखला जावू लागला. त्यानंतर ज्यांनी संसारी जीवनाचा स्वीकार केला व व्यापार, धंद्यामध्ये पारंगत बनला तो वैश्य म्हणून ओळखला जावू लागला व हेच वैश्याच्या निर्मितीस कारण ठरले तरीही काही लोक शिकार आणि कमी दर्जाचे हस्तव्यवसाय करून राहू लागले त्यांना शूद्र म्हणून ओळखले जावू लागले व हाच घटक शूद्र वर्गाच्या निर्मितीस कारणीभूत ठरला. या वरील चारही वर्गातील पुन्हा काही लोकांनी आपल्या कर्माचा, घरांचा आणि संसारी जीवनाचा त्याग केला त्यांना साधू परिव्राजक म्हणून ओळखले जावू लागले.

अशा प्रकारे गौतम बुद्धांनी आपला सामाजिक कराराचा सिद्धांत मांडला. गौतम बुद्धांनी आपला सामाजिक कराराचा सिद्धांत मांडताना त्यामध्ये दैवी हस्तक्षेप टाळला व माणसांनी एकत्र येवून परस्परांच्यामध्ये सुरक्षिततेसाठी हा करार केल्याचे सांगितले. गौतम बुद्धांचा हा सामाजिक कराराचा सिद्धांत पाहत असताना आपणास हॉब्जच्या नैसर्गिक अवस्थेची आठवण होते. गौतम बुद्धांनी या सिद्धांताद्वारे समाजामध्ये श्रमाची विभागणी व प्रत्येकाच्या कर्मावरून त्या-त्या वर्गाची विभागणी कशापद्धतीने झाली याचे विवेचन केले आहे. गौतम बुद्धांनी सामाजिक कराराच्या सिद्धांताद्वारे मनुष्य व त्याने निर्माण केलेल्या सामाजिक आणि राजकीय संस्था व त्याचा विकास टप्प्याटप्प्याने उत्क्रांत झाला हे दाखवून दिले. गौतम बुद्धांच्या या सिद्धांद्वारे आपणास असे दिसून येते की, मनुष्याने प्रथम कुटूंबसंस्था निर्माण केली, त्यानंतर निर्माण झालेल्या अराजकतेतून मुक्तता मिळविण्यासाठी एकत्रित येवून समाजसंस्था निर्माण केली व या समाजसंस्थेचे नियमन आणि नियंत्रण करण्यासाठी राज्यसंस्थेची निर्मिती केली.

**गौतम बुद्धांचा राज्यउत्पत्तीचा सिद्धांत :**

गौतम बुद्धांनी दीघनिकायामध्ये मांडलेल्या वरील 'अगना' सुक्तामधूनच[२०] राज्यसंस्थेच्या निर्मितीस महत्त्वाची तात्त्विक पार्श्वभूमी प्राप्त झाल्याचे दिसून येते. प्राचीन भारतीय राजकीय विचारांच्यादृष्टीने गौतम बुद्धांनी मांडलेला राज्यउत्पत्तीचा सिद्धांत अतिशय महत्त्वाचा आहे. गौतम बुद्धांनी मांडलेला हा राज्यउत्पत्तीचा सिद्धांत लोकशाही मार्गावर आधारलेला दिसून येतो. गौतम बुद्धांनी या सिद्धांतामध्ये राज्याच्या निर्मितीमधील व राजाच्या निवडीमधील दैवी हस्तक्षेप नाकारला.

त्यांच्या मते, जेव्हा मनुष्याने लोभीपणाने पृथ्वीवर निर्माण झालेल्या भाताचा आस्वाद घेतला तेव्हा मनुष्याचे पूर्वीचे तेजस्वी दिव्यवायूरूप नष्ट झाले, व त्यांना सामान्य माणसाच्या शरीरासारखी घनरूप अवस्था प्राप्त झाली. मनुष्याचे शरीर घनरूप बनत असतानाच काही व्यक्तींना अतिशय सौंदर्य प्राप्त झाले तर काही लोक कुरूप निर्माण झाले. मनुष्यामध्ये वर्णभेद (रंग) ही निर्माण झाला. त्यामुळे सौंदर्यशाली माणसे कुरूप माणसांचा तिरस्कार करू लागली. माणसामध्ये भूक, तहान, प्रेम, मोह, लोभ, वासना, इत्यादीं भावनांची निर्मिती झाली. तेव्हा माणसाने आपली भूक भागविण्यासाठी म्हणून भाताचा संचय करण्यास सुरूवात केली. त्याचबरोबर लैंगिक भिन्नत्त्वामुळे स्त्री-पुरूषांमध्ये कामवासना निर्माण झाली तेव्हा माणसाने या कामवासनेची पूर्तता करण्यासाठी व भात साठविण्यासाठी घरांची निर्मिती केली व अशा पद्धतीने समाजामध्ये कुटूंबसंस्थेचा उदय झाला. कुटूंबसंस्थेच्या निर्मितीनंतर माणसाने लोभापोटी जास्तीत जास्त भात संचय करण्यास सुरूवात केली. त्याचबरोबर इतर जीवनावश्यक वस्तूंचाही संचय करण्यास सुरूवात केली. व यातूनच खाजगी मालमत्तेची निर्मिती झाली. खाजगी मालमत्तेच्या निर्मितीनंतर चोऱ्यांचे प्रमाण वाढले. माणसे एकमेकांचा द्वेषमत्सर करू लागली. व एकंदरीत अराजकता निर्माण झाली. या अराजकतेच्या परिस्थितीवर मात करण्यासाठी व आपापल्या शेताची वाटणी करून त्यांच्या योग्य सीमा ठरविण्यासाठी लोक एकत्र आले व त्यांनी आपापसामध्ये विचार-विनिमय करून आपल्यामधूनच एका सर्वात आकर्षक, कार्यकुशल आणि उत्तम प्रकृती असलेल्या

व्यक्तीची नेता म्हणून निवड करण्याचा करार केला.[२१] तेव्हा त्या व्यक्तीने लोकांना या अराजकतेच्या परिस्थितीतून बाहेर काढण्याचे मान्य केले. परंतु तत्पुर्वी त्याने त्यासाठी काही आवश्यक अटी घातल्या. त्या म्हणजे जेथे क्रोधित होणे आवश्यक आहे, तेथे तो क्रोधित होईल. ज्यांचा धिक्कार करणे आवश्यक आहे, त्यांचा धिक्कार करेल. व ज्यांना हद्दपार करणे आवश्यक आहे, त्यांना तो हद्दपार करेल. लोकांनी त्या नेत्याच्या उपरोक्त अटी मान्य करून त्याबद्दल्यामध्ये त्यास आपल्या उत्पन्नामधील काही भात कर म्हणून देण्याचे मान्य केले. अशा प्रकारे निवड झालेल्या नेत्यासच १) महासम्मत — म्हणजे सर्वानुमते निवड झालेला २) खत्तिय — म्हणजे दुसऱ्यांच्या शेताचा स्वामी व ३) राजा — म्हणजे धर्माच्या अनुषंगाने लोकांचे रंजन करणारा अशी पदनामे प्राप्त झाली.राजाच्या निर्मितीतूनच राज्यसंस्थेची निर्मिती झाली.[२२] लोकांच्यामध्ये शेतीचे वाटप करणे, त्यांच्या शेतीचे रक्षण करणे, आपापसातील मतभेद मिटवून राज्यात शांतता निर्माण करणे इत्यादी जबाबदारी राजावर म्हणजे राज्यसंस्थेवर येवून पडली. राज्यसंस्था निर्मितीच्या पूर्वावस्थेमध्येच समाजसंस्थेची निर्मिती झाली.

**गौतम बुद्धांच्या सामाजिक करार व राज्यउत्पत्तीच्या सिद्धांताची राजकीय मीमांसा:**

प्राचीन भारतामध्ये गौतम बुद्धांनी मांडलेला सामाजिक कराराचा सिद्धांत राजकीय दृष्टीकोनातून महत्त्वाचा आहे. गौतम बुद्धांनी हा सिद्धांत प्रामुख्याने जगाच्या उत्पत्तीच्यासंदर्भामध्ये मांडला होता. परंतु जगाची उत्पत्ती होत असतानाच कुटूंबसंस्था, समाजसंस्था, खाजगी संपत्ती आणि राज्यसंस्था याची उत्पत्ती कशी झाली याचे विवेचन या सिद्धांतामध्ये केल्याचे आढळून येते. गौतम बुद्धांच्या या सिद्धांताच्या अगोदरही प्राचीन भारतामध्ये जगाच्या निर्मितीची उत्पत्ती कशी झाली याचे विवेचन ऋग्वेदात व इतर वैदिक साहित्यामध्ये आढळून येते. परंतु वैदिक साहित्य आणि गौतम बुद्धांनी मांडलेल्या या सिद्धांतामध्ये फरक आढळून येतो. वैदिक साहित्यामध्ये मांडण्यात आलेल्या सिद्धांतानुसार या जगाची उत्पत्ती ही एका विराट पुरूषाच्या (ब्रह्मदेवाच्या) शरीरापासून झाली आहे व समाजामध्ये जे वर्ण निर्माण झाले आहेत ते ब्रह्मदेवाच्या

शरीराच्या वेगवेगळ्या अवयवापासून निर्माण झाले आहेत. असे ग्रंथीत केले आहे.[२३] वैदिक सिद्धांतानुसार जगाची उत्पत्ती ही ईश्वरीय आहे असे मांडण्यात आले. परंतु गौतम बुद्धांनी प्रथमच ईश्वरीय सिद्धांत नाकारला व आपला नवीन उत्पत्तीचा सिद्धांत मांडला.

गौतम बुद्धांनी जो राज्याच्या उत्पत्तीचा सिद्धांत मांडला त्यामध्ये मानवी उपक्रमास आणि कर्तुत्त्वास प्रथमच महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले. गौतम बुद्धांनी जगाच्या उत्पत्तीचा जो सिद्धांत मांडला तो मानवी जीवनास प्रतिष्ठा मिळवून देणारा ठरला. गौतम बुद्धांनी आपल्या या सिद्धांतामध्ये ईश्वरी हस्तक्षेप टाळला व समाजव्यवस्था आणि राज्यसंस्था मानवाच्या सुखी व समृद्ध जीवनास आवश्यक आहेत व त्यांची निर्मिती मनुष्यांनी आपापसामध्ये करार करून केली असल्याचे सांगितले. गौतम बुद्धांनी तत्कालिन समाज व्यवस्थेत जी जातीवर अधिष्ठित चार्तुवर्ण्यव्यवस्था होती तिला आव्हान दिले व समाजामध्ये वर्णव्यवस्था ही श्रमविभागणीच्या तत्त्वानुसार झाल्याचे दाखवून दिले. प्रत्येक माणसाच्या कर्मावरून त्याचा वर्ग ठरला असे गौतम बुद्ध – दाखवून देतात. या सिद्धांतानुसार राज्याचे संरक्षण करण्यासाठी प्रथम क्षत्रिय वर्ग निर्माण झाला.[२४] त्यानंतर राज्यात बौद्धिक विचार मांडणारा व जंगलामध्ये राहून ग्रंथनिर्मिती करणारा ब्राह्मण वर्ग निर्माण झाला. नंतर व्यवसाय आणि उद्योगधंद्यामध्ये तरबेज असणारा वैश्य वर्ग निर्माण झाला व शेवटी लहान–मोठी हस्तकौशल्याची कामे व शिकारी करणारा असा शूद्र वर्ग निर्माण झाला असे गौतम बुद्ध सांगतात. या श्रमावर आधारित वर्गनिर्मितीद्वारे तत्कालिन समाजव्यवस्थेमध्ये वैदिक साहित्याने जी ब्रह्माच्या मुखातून ब्राह्मण, त्याच्या बाहूतून क्षत्रिय, जांघातून वैश्य व पायातून शूद्र जन्मास आले अशी मांडणी केली होती त्यास गौतम बुद्धांनी फाटा दिला.

गौतम बुद्धांच्या या सिद्धांतामध्ये आपणास प्रामुख्याने दोन करार झाल्याचे दिसून येतात. यामधील पहिला करार हा सर्व माणसांनी एकत्र येवून अराजकता नष्ट करण्यासाठी राजाची निवड करण्यासंबंधीचा आहे. या पहिल्या करारानुसार माणसांनी आपापसामध्ये करार केला, व राज्यसंस्थेची, राजाची निवड केली. परंतु राजाची निवड

होण्याअगोदरच जेव्हा माणसे एकत्र आली तेव्हाच समाजाची, समाजसंस्थेची निर्मिती झाली व नंतर या समाजातील माणसांनी राज्यसंस्थेची निर्मिती केली. यामध्ये दुसरा जो करार आहे तो राजा व समाजातील इतर लोक यांच्यामध्ये आहे. व हा करार राजकीय दृष्टीने महत्त्वाचा आहे. या दुसऱ्या करारानुसार राजाने प्रजेवर काही अटी घातल्या व त्या प्रजेने मान्य केल्या तेव्हा त्यास लोकांची अधिमान्यता मिळाली. लोकांनी आपल्या उत्पन्नातील काही भाग भात राजास देण्याचे मान्य केले व त्याबदल्यात राजाने लोकांच्या शेताचे रक्षण करणे व सुव्यवस्था निर्माण करण्याचे मान्य केले. हा करार महत्त्वाचा करार ठरला. व यानुसार राजा आणि प्रजा यांच्यातील संबंध आणि परस्परांची कर्तव्ये निश्चिंत झाली.

गौतम बुद्धांनी जो सामाजिक आणि राजकीय करार मांडला त्यामध्ये मानवी अधिकारांना महत्त्वाचे अधिष्ठान मिळाल्याचे दिसून येते. मानवाला जीवन जगण्याचा व ते जीवन सुव्यवस्थित, आनंदी, सुखात जगण्याचा अधिकार जन्मत:च प्राप्त होतो व तो मिळविण्यासाठी तो सतत धडपडत असतो. या धडपडीतूनच त्याने कुटूंबसंस्था, मालमत्ता, समाजसंस्था आणि राज्यसंस्था निर्माण केल्याचे दिसून येते व या राज्यसंस्थेच्या निर्मितीतूनच माणसाच्या या नैसर्गिक हक्काचे संरक्षण होवू शकले. गौतम बुद्धांच्या या सिद्धांतामध्ये लोकांनी जी राजाची (राज्यसंस्थेची) निवड केली, ती लोकशाही तत्त्वावर झाल्याचे दिसून येते. या सिद्धांतामध्ये वैदिक साहित्यातील सिद्धांतानुसार राजाची निवड ही ईश्वराच्या हस्ते झाली असे वर्णन आहे. त्यास छेद देण्यात आला व लोकांनी आपापसामध्ये विचारविनिमय करून राजाची निवड सर्वानुमते केली. व या राजाची निवड करतानाही त्यांनी त्याच्या पात्रतेला महत्त्वाचे स्थान दिले. राजा व प्रजा यांच्यामध्ये जो करार झाला त्यानुसार एके ठिकाणी राजा अशी अट ठेवतो की, ज्यांचा धिक्कार करणे आवश्यक आहे, त्यांचा धिक्कार करीन, ज्यांची लायकी हद्दपारीची आहे त्यांना तो हद्दपार करीन. यावरून आपणास असे दिसून येते की, गौतम बुद्धांचा धम्म हा अहिंसेवर आधारीत होता. त्यामुळे त्यांनी गुन्हेगाराला हिंसक शिक्षा न देता केवळ त्या गुन्हेगाराला अपमानास्पद वाटेल अशाच शिक्षा दिल्या

कारण बौद्ध धर्माचे खरे अनुयायी लज्जा (hiri) आणि भीती (ottappa) दुष्कृत्य करण्यास धजावत नाहीत[२५] अशी त्यामागील भावना होती.

गौतम बुद्धांनी हा जो सामाजिक करार मांडला व त्याअंतर्गत राज्यउत्पत्तीचा सिद्धांत सांगितला त्यांची आपणास पुढील तीन वैशिष्ट्ये आढळून येतात.

१) राज्याची निर्मिती ही मानवनिर्मित असून त्यात ईश्वराचा हस्तक्षेप नाही.

२) राज्याची निर्मिती ही लोकांच्या परस्पर संघर्षातून निर्माण झालेल्या अराजकतेवर मात करण्यासाठी झाली. कारण लोकांच्यात प्रथम आपापसात मतभेद होता. लोकांना आपण परस्परात संघर्ष करून कायदा टिकवू शकत नाही याची जाणीव झाली, त्यामुळे त्यांनी राज्यसंस्थेची निर्मिती केली. माणसा-माणसातील संघर्ष कमी करून त्यांच्यातील मतभेद मिटवून, त्यांना संरक्षण देणे हे राज्यसंस्थेचे कार्य होते.

३) राजाला लोकांचे संरक्षण करण्यासाठी साधनसामुग्रीची आवश्यक्ता असते, त्यासाठी लोकांनी आपल्या उत्पादनातील काही भाग भात्र देण्याचे कबूल केले. गौतम बुद्धांनी अशा प्रकारे समाजसंस्थेचा आणि राज्यसंस्थेचा विकास हा करारातून टप्प्याटप्प्याने होत गेला असे दाखवून दिले.

**गौतम बुद्ध आणि पाश्चात्य सामाजिक करारवादी विचारवंत -**

गौतम बुद्धांची पाश्चात्य सामाजिक करारवादी विचारवंताबरोबर तुलना करण्याअगोदर आपण हे लक्षात घेतले पाहिजे की, गौतम बुद्ध त्यांच्या अगोदर सुमारे दोन हजार वर्षांपूर्वी होवून गेले आहेत. तर पाश्चात्य विचारवंत हॉब्ज-लॉक-रूसो यांनी आपला सामाजिक कराराचा सिद्धांत इ.स. १६व्या, १७व्या शतकात मांडला आहे. जेव्हा हॉब्ज, लॉक, रूसो यांनी आपला सामाजिक कराराचा सिद्धांत मांडला. त्यावेळच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय परिस्थितीचा विचार केला तर आपणास असे दिसून येते की, या कालावधीमध्ये औद्योगिक क्रांती झाली होती. समाजव्यवस्था आणि राज्यव्यवस्था बळकट झाली होती. जागतीक राजकीय व्यवस्थेमध्ये अनुक्रमे सरंजामशाही, भांडवलशाही आणि लोकशाही अशा प्रकारे बदल घडून आला होता.

इ.स. १६४०-४८ या दरम्यान ब्रिटनमध्ये नागरी युद्ध निर्माण होवून तेथील राजसत्ता बिकट परिस्थितीतून जात होती.[२६] लोकांच्या राजकीय जाणीवा प्रगल्भ झाल्या होत्या. लोकांची वांशिक भावना बळकट झाली होती. अशा बदललेल्या परिस्थितीमध्ये हॉब्ज-लॉक आणि रूसो यांनी आपले सामाजिक कराराचे सिद्धांत मांडले, त्यामुळे अर्थातच या परिस्थितीचा परिणाम म्हणून त्यांनी मांडणी जास्तीत जास्त लोकशाहीवादी, तार्किक आणि उदारमतवादी होणे अपरिहार्य होते.

परंतु; भगवान गौतम बुद्धांचा कालावधी पहिला तर अजून माणूस बराच अडाणी होता. माणसाच्या मनावर देव-दैवतांचा दबाव होता. माणूस छोट्या-छोट्या टोळ्यामध्ये विभागला गेला होता. माणसाच्या राजकीय, सामाजिक जाणीवा असून प्रगल्भ झाल्या नव्हत्या. त्याच बरोबर राजकीय व्यवस्था म्हणून मोठ्या प्रमाणात राजेशाही व्यवस्थाच प्रचलित होती. त्यामुळे गौतम बुद्धांच्या मांडणीमध्ये त्याकाळच्या राजकीय व्यवस्थेची छाप पडणे हे काही आश्चर्य नव्हते. गौतम बुद्धांच्या कालावधीमध्ये वैदिक धर्मसंस्कृतीचा, वैदिक साहित्याचा समाजमनावर पगडा होता. वर्णव्यवस्थेच्या आणि राज्यव्यवस्थेच्या दैवी उत्पत्तीचा सिद्धांत जनमाणसामध्ये रूजला होता. त्यामुळे गौतम बुद्धांच्या सामाजिक कराराच्या सिद्धांता कल्पनाविलास हे गुण असणे स्वाभाविक आहे. परंतु तरीही या गोष्टींचा म्हणावा असा जास्त परिणाम त्यांच्यावर झालेला दिसून येत नाही. गौतम बुद्धांनी मांडलेल्या सामाजिक कराराच्या सिद्धांताचे मूळ आपणास त्याकाळात अस्तित्त्वात असलेल्या महाजनसत्तेत दिसते. मात्र हॉब्ज, लॉक, रूसो यांच्या सामाजिक कराराचे मुळ त्या काळातील एक राजसत्तेच्या अस्तित्त्वात असल्याचे दिसते.२७ गौतम बुद्धांनी जो सामाजिक कराराचा सिद्धांत मांडला तो आपणास रूसोच्या आदर्श राज्याची व त्यानंतर येणाऱ्या नैसर्गिक अवस्थेची जिचे वर्णन हॉब्जने केले आहे, आठवण करून देतो.२८

हॉब्ज-लॉक-रूसो आणि तथागत गौतम बुद्ध यांच्या सामाजिक करार आणि राज्य उत्पत्तीचा सिद्धांत यांची तुलना करताना आपणास प्रामुख्याने काही समान गोष्टी आढळतात. त्यामध्ये आपणास असे दिसून येते की, मनुष्य प्राणी कायम स्वरूपी

अराजक अवस्थेमध्ये राहू शकत नाही. तो सतत सुख, शांतीच्या शोधामध्ये असतो. हॉब्जच्या सामाजिक कराराचे परीक्षण केले तर आपल्या असे लक्षात येते की, हॉब्जच्या करारानुसार लोकांनी आपले नैसर्गिक अधिकार एका विशिष्ट व्यक्तीला किंवा व्यक्तिसमूहाला अर्पण केले त्यामुळे ती व्यक्ती किंवा व्यक्तीसमूह सार्वभौम बनली. आणि तिने संपूर्ण राज्याच्या संरक्षणाची जबाबदारी स्वत:वर स्वीकारली, अशीच मांडणी आपणास गौतम बुद्धांच्या सामाजिक करारामध्ये आढळून येते. गौतम बुद्धांच्या सिद्धांतामध्ये महासम्मताची किंवा खत्तियाची निवड लोकांनी या अराजकतेतून स्वत:ची सुटका करून घेण्यासाठीच केली आहे.

पाश्चात्य व गौतम बुद्धांच्या सामाजिक कराराचे आणखी एक वैशिष्ठ्य या सर्वांनी राजकीय सत्तेची निर्मिती हा लोकांच्या सम्मतीतून झाल्याचे सांगितले. गौतम बुद्धांनी आपल्या सामाजिक आणि राजकीय संस्थाच्या या उत्पत्ती सिद्धांतामध्ये दैवी हस्तक्षेप नाकारला व राज्यसंस्था ही मानवाच्या बुद्धीनिष्ठेतून व मानवी कृतीतून साकार झाल्याचे सांगितले. हॉब्ज-लॉक-रूसो यांनीही आपल्या सिद्धांतामध्ये ईश्वरास कोणतेही स्थान दिले नाही.

चौघांच्याही सामाजिक करारातून आपणास एक समान सुत्र सापडते ते म्हणजे मानवाने आपली अराजकेच्या अवस्थेतून सुटका करून घेण्यासाठी समाजसंस्था व राज्यसंस्थेची निर्मिती केली आहे. इतरांच्या तुलनेत गौतम बुद्धांच्या सिद्धांताची मांडणी सोपी व सुसंगत आहे.

# संदर्भ ग्रंथ सुची


१) डॉ. भोळे भास्कर – 'राजकीय सिद्धांत', पिंपळापुरे अॅन्ड कंपनी पब्लिशर्स, नागपूर, ऑगस्ट, २००६ पान नं. ४७.

२) कित्ता वरीलप्रमाणे – पान नं. ४७

३) कित्ता वरीलप्रमाणे – पान नं. ५३

४) कित्ता वरीलप्रमाणे – पान नं. ५३

५) कित्ता वरीलप्रमाणे – पान नं. ५६

६) कित्ता वरीलप्रमाणे – पान नं. ६१

७) Agrawala V. S. - 'India as known to Panini, Prithvi Prakashan, Varanasi, 1963.

८) डॉ. मोरखंडीकर रा. शा. – "प्राचीन भारतीय राजनीती", म. वि. ग्रंथनिर्मिती मंडळासाठी, परिमल प्रकाशन, औरंगाबाद, १९७६, पान नं. ५२

९) कंगले रा. प. – मौज प्रकाशन, मुबंई, १९६९

१०) भागवत दुर्गा - (संपादीत) "सिद्धार्थ जातक", वरदा बुक्स, पुणे, १९९७, पान नं. ३००

११) Ghoshal U. N. - "A History of Indian Political Ideas" Oxford University Press, 1959, Page No. 62

१२) गर्दे दि. का. – "प्राचीन भारतीय राज्यविचार", म. वि. ग्रंथनिर्मिती मंडळासाठी, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे – १९७९, पान नं. १४४

१३) कित्ता १० प्रमाणे – पान नं. ६२

१४) कित्ता १० प्रमाणे – पान नं. ६२

१५) कित्ता ११ प्रमाणे – पान नं. १४४

१६) कित्ता १० प्रमाणे – पान नं. ६३

१७) डॉ. शर्मा रामशरण, (मराठी अनु. पंढरीनाथ रानडे) – "प्राचीन भारतातील राजकीय विचार आणि संस्था", डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, २००६, पान नं. ६७

१८) कित्ता वरील प्रमाणे

१९) कित्ता १० प्रमाणे – पान नं. ६३

२०) कित्ता १० प्रमाणे –

२१) कित्ता १७ प्रमाणे – पान नं. ६७

२२) कित्ता वरील प्रमाणे –

२३) डॉ. आंबेडकर बाबासाहेब, "शूद्र पूर्वी कोण होते?", क्षितीज पब्लिकेशन, नागपूर, २००१, पान नं. ९१

२४) कित्ता १७ प्रमाणे – पान नं. ६६

२५) वाघ विलास – "बौद्ध धम्मात शिक्षेची संकल्पना", सुगावा प्रकाशन, पुणे, २००६, पान नं. ७

२६) Joshri J. C., "Comparative Politics", Sterling Publication Pvt. Ltd., New Delhi, 2005, Page No. 265

२७) कित्ता १७ प्रमाणे – पान नं. ७६

२८) कित्ता वरील प्रमाणे – पान नं. ६६